सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २१९ | शुक्रवार, दि. ०१ मे २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## निवेदन

शुक्रवार, दि. १ मे २०२६ रोजी कामगार दिनानिमित्त ग्लोबल महातेज कार्यालयास सुट्टी असल्याने शनिवारचा अंक प्रसिद्ध होणार नाही.याची आमचे वाचक,जाहिरातदार व वृत्तपत्र वितरक व हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

–संपादक

# शेतकरी संघ निवडणुकीचा बिगुल



## अमळनेरात राजकीय हालचालींना वेग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गेल्या काही वर्षांपासून अमळनेर तालुका शेतकरी सहकारी संघावर प्रशासक राज असताना, मोठ्या प्रतीक्षेनंतर संघाची निवडणूक जाहीर झाली आहे. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे.

सदर कार्यक्रमानुसार २७ एप्रिल ते ४ मे दरम्यान नामनिर्देशन अर्ज विक्री व दाखल करण्याची मुदत निश्चित करण्यात आली आहे. आवश्यकता भासल्यास ३० मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. एकूण १५ जागांसाठी ही निवडणूक होत असून, त्यामध्ये व्यक्ती प्रतिनिधी ५, सोसायटी प्रतिनिधी ५, महिला राखीव २, इमाव २, अनु. जाती/जमाती १ तसेच इतर प्रवर्गातील जागांचा समावेश आहे.ही निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी धर्मराज पाटील (सहायक निबंधक, अमळनेर) यांच्या नियंत्रणाखाली होणार आहे. ५ मे रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी होईल, तर ६ मे रोजी नामनिर्देशन पत्रांची प्राथमिक यादी प्रसिद्ध केली जाईल. २१ मे रोजी चिन्ह वाटप करून अंतिम विधिग्राह्य उमेदवारांची यादी जाहीर करण्यात येईल. आवश्यकता भासल्यास ३० मे रोजी मतदान, तर ३१ मे रोजी मतमोजणी होऊन लगेचच निकाल जाहीर करण्यात येणार आहे.दरम्यान, निवडणूक जाहीर होताच राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना (शिंदे गट), काँग्रेस तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) यांनी निवडणुकीसाठी व्यूहरचना आखण्यास सुरुवात केली आहे. इच्छुक उमेदवारांनी आपापल्या पक्षाकडे लॉबिंग सुरू केले असून, काहींकडून निवडणूक बिनविरोध करण्याचेही प्रयत्न सुरू आहेत.अनेक वर्षांनंतर ही निवडणूक होत असल्याने, तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका लांबणीवर पडल्यामुळे ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. आमदार अनिल पाटील यांच्यासह सर्वपक्षीय नेत्यांनी प्रयत्न केल्यास ही निवडणूक बिनविरोध होऊन संघाचा आर्थिक भार कमी होण्याची शक्यता आहे.

# सावधान! अमळनेरकरांच्या आरोग्याशी खेळ

## रसवंती आणि गोळ्यासाठी अखाद्य बर्फाचा सर्रास वापर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरात वाढत्या तापमानामुळे नागरिक थंड पेयांकडे वळत असताना, त्यांच्या आरोग्यावर मोठे संकट घोंघावत आहे. रसवंती गृह, कोल्ड्रिंक्स हाऊस आणि बर्फाचे गोळे विकणाऱ्या गाड्यांवर चक्क अखाद्य बर्फाचा वापर केला जात आहे. हा बर्फ दूषित पाणी आणि बोरिंगच्या पाण्यापासून बनवला जात असून, तो आरोग्यासाठी अत्यंत घातक असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. अमळनेर शहरात पुरवठा केला जाणारा हा बर्फ पांढराशुभ्र नसून तो काहीसा काळा किंवा धुरकट रंगाचा दिसत आहे. हा बर्फ विशेषतः मासे साठवण्यासाठी किंवा औद्योगिक कामांसाठी वापरला जातो. मात्र, स्वस्त दरात मिळत असल्याने विक्रेते हाच अखाद्य बर्फ खरेदी करून तो नागरिकांच्या पोटात ढकलत आहेत. बोरिंगच्या क्षारयुक्त आणि प्रक्रिया न केलेल्या दूषित पाण्यापासून हा बर्फ तयार केला जात आहे.प्रशासकीय नियमांनुसार, पिण्यासाठी वापरला जाणारा बर्फ हा शुद्ध पाण्यापासून बनवलेला असावा लागतो. याउलट, औद्योगिक वापराचा बर्फ हा निळ्या रंगाच्या कोटिंगमध्ये किंवा स्पष्टपणे 'अखाद्य' म्हणून चिन्हांकित करणे आवश्यक असते. मात्र, अमळनेरमध्ये कोणताही नियम न पाळता हा काळा दिसणारा घातक बर्फ सर्रास वापरला जात आहे.या दूषित बर्फाच्या वापरामुळे नागरिकांना आजारांचा धोका निर्माण होत आहे.शहरातील मुख्य चौकात, बस स्थानक परिसर आणि गर्दीच्या ठिकाणी अशा गाड्यांची संख्या मोठी आहे. मात्र, अन्न व औषध प्रशासन किंवा स्थानिक नगर परिषद आरोग्य विभागाकडून अद्याप कोणतीही कठोर कारवाई करण्यात आलेली नाही. प्रशासनाच्या या सुस्त कारभारामुळे विक्रेत्यांचे धाडस वाढले असून, सामान्यांचे आयुष्य धोक्यात आले आहे.



### ग्राहकांनी काय काळजी घ्यावी?

* बर्फाचा रंग तपासा : जर तो पारदर्शक नसेल किंवा काळा–धुरकट दिसत असेल तर तो वापरू नका.
* रसवंतीवर बर्फाची लादी कोठून आणली आहे, याची विचारणा करा.शक्यतो घरी बनवलेल्या नैसर्गिक पेयांना प्राधान्य द्या.
* अखाद्य बर्फाचा वापर आढळल्यास त्वरित आरोग्य विभागाकडे तक्रार करा.

"अखाद्य बर्फाचा वापर करणे हा टाळले पाहिजे. अशा बर्फामध्ये मोठ्या प्रमाणात घातक जीवाणू असतात.यामुळे उलट्या, जुलाब आणि तीव्र पोटदुखी.दूषित पाण्यातील बॅक्टेरियांमुळे फूड पॉयझनिंगचा धोका.टायफॉइड, कॉलरा आणि कावीळ यांसारख्या जलजन्य आजारांची लागण होण्याची शक्यता असते .घशाचे संक्रमण आणि फुफ्फुसाचे विकार यामुळे होत असतात.

**– डॉ.जे.एम.पाटील,**
**वैद्यकीय अधिकारी अमळनेर.**



## राजीव गांधींच्या हत्येतील आरोपी आता वकिली करणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हत्येमध्ये सहभाग असल्याबद्दल ए. जी. पेरावलन यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. त्यांनी तीन दशके तुरुंगात घालवली. आता त्यांनी वकील म्हणून नोंदणी केली आहे. १८ मे २०२२ रोजी सर्वोच्च न्यायालयाने त्यांची सुटका केली होती. सुटकेनंतर, त्यांनी कर्नाटकातील एका खासगी विधी महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि आपला अभ्यासक्रम पूर्ण केला. उच्च न्यायालयाच्या सभागृहात बार कौन्सिल ऑफ तामिळनाडू आणि पुदुचेरीने आयोजित केलेल्या नोंदणी समारंभात त्यांची वकील म्हणून नोंदणी करण्यात आली. पेरावलन यांनी २७ एप्रिल रोजी वकिलीचा व्यवसाय स्वीकारला आणि आता ते मद्रास उच्च न्यायालयात वकिली करण्याचा विचार करत आहेत. पेरावलन यांनी सांगितले की, कैद्यांना कायदेशीर मदत देणे हे त्यांचे मुख्य लक्ष असेल.पेरावलन यांना १९९१ मध्ये अटक करण्यात आली होती. त्यावेळी ते १९ वर्षांचे होते. हत्येमध्ये वापरलेल्या स्फोटक उपकरणासाठी ९–व्होल्टची बॅटरी पुरवल्याचा आरोप पेरावलन यांच्यावर होता. त्यांनी बंगळूरु येथील डॉ. बी. आर.आंबेडकर लॉ कॉलेजमधून शिक्षण घेतले आणि नंतर २०२५ मध्ये अखिल भारतीय बार परीक्षा उत्तीर्ण केली.

तुरुंगात असताना, पेरावलन यांनी तुरुंगवासाला आपल्या शैक्षणिक ध्येयांमध्ये अडथळा येऊ दिला नाही आणि आपले उच्च शिक्षण सुरू ठेवले. त्यांनी तामिळनाडू मुक्त विद्यापीठाने देऊ केलेल्या डिप्लोमा कोर्समध्ये अव्वल स्थान मिळवून सुवर्णपदक जिंकले आणि २०१२ च्या इंटरमिजिएट परीक्षेत १,२०० पैकी १,०९६ गुण मिळवून कैद्यांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. सेंट्रल जेलमध्ये कैद असताना, त्यांनी इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठातून कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्समध्ये पदवी आणि पदव्युत्तर पदवी, तसेच इतर सात डिप्लोमा अभ्यासक्रम पूर्ण केले, त्यापैकी काही त्यांनी मृत्यूदंडाच्या कोठडीत असताना पूर्ण केले. पेरावलनचा जन्म ३० जुलै १९७१ रोजी तामिळनाडूतील जोलारपेट येथे झाला. वडील ज्ञानसेकरन कुएनलादासन आणि आई अर्पुथम अम्माल होत्या. पेरावलनचे आई–वडील तामिळनाडूतील द्रविड चळवळीचे संस्थापक पेरियार ई. व्ही. रामस्वामी यांचे अनुयायी होते. पेरावलनने दहावीच्या परीक्षेत शाळेत दुसरा सर्वोच्च गुण मिळवला होता. दहावी पूर्ण केल्यानंतर, पेरावलनने इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी डिप्लोमा अभ्यासक्रम पूर्ण केला.राजीव गांधी हत्या प्रकरणी पेरावलनने ३१ वर्षे तुरुंगात घालवली. सेंट्रल जेलमध्ये कैद असताना, त्यांनी इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठातून कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्समध्ये पदवी आणि पदव्युत्तर पदवी, तसेच इतर सात डिप्लोमा अभ्यासक्रम पूर्ण केले.



## आजचे अभीष्टचिंतन





**श्री. सुरेश पाटील**
उपाध्यक्ष, मंगळग्रह सेवा संस्था



**श्री. अनिल अहिरराव**
विश्वस्त, मंगळग्रह सेवा संस्था



**प्रा.सौ.अनुराधा पोतदार**
धुळे



**श्री.शांताराम महाजन**
पोलीस अधिकारी



**श्री.कैलास पाटील**
मुख्याध्यापक



**श्री. चंद्रकांत अमृतकर**
निवृत्त उपमुख्याध्यापक



**श्री.अरुण पाटील**
अमळनेर



**श्री. विंचुरकर सर**
शिक्षक



**श्री. पंकज शिसोदे**
सेवेकरी, मंगळग्रह मंदिर

## दिनविशेष

०१ मे

- रामकृष्ण मिशन ची सुरूवात स्वामी विवेकानंद यांनी केली.
- जागतिक कामगार दिन हा भारतात पहिल्यांदा साजरा केला.
- मुंबईसह मराठी भाषिक 'महाराष्ट्र' राज्य आणि 'गुजरात' राज्य या स्वतंत्र राज्यांचा निर्माण झाला.
- गुजरात उच्च न्यायालयाची स्थापना झाली.
- महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांची स्थापना.

### संतश्री सखाराम महाराज यात्रोत्सव

# भक्तिभावपूर्ण आज होणार पालखी सोहळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्री संत सखाराम महाराज यांच्या वार्षिक यात्रोत्सवानिमित्त शुक्रवार दि. १ मे रोजी पारंपरिक व भक्तिभावपूर्ण वातावरणात पालखी सोहळा होणार आहे. सकाळी ६ वाजता श्री सखाराम महाराजांची भरजरी पोषाख परिधान केलेली, अलंकारांनी सजवलेली आणि हातात चांदीची ढाल–तलवार घेतलेली लालजींची मूर्ती पालखीत विराजमान करण्यात



येईल. पालखीच्या मागे महाराजांच्या पादुका आणि मूर्ती रथातून गादिपती श्री प्रसाद महाराजांच्या मार्गदर्शनाखाली पुढे नेण्यात येतील.गावातील मुख्य रस्त्याने पालखीची भव्य मिरवणूक निघणार आहे.अनेक वर्षांपासून चालत आलेल्या परंपरेप्रमाणे, घरोघरी जाऊन पानसुपारीचा कार्यक्रम होईल. दगडी दरवाजातून, पुलावरून, पैलाड भागात ही पालखी लेझीम पथक, ढोल–ताशा आणि भजनदिंडीच्या गजरात पुढे जाणार आहे.

पैलाड भागातून पालखी रात्री ९ वाजेच्या सुमारास श्री सखाराम महाराज समाधीस्थळी पोहचेल.यंदा मिरवणुकीचे विशेष आकर्षण असेल ते भुसावळ येथील रेल्वे बँड त्यांचा पारंपरिक आणि सुमधुर संगीत सादरीकरण आणि सायंकाळी समर्थ बॅन्ड,चाळीसगाव पैलाड भागातून वाद्यवृंद सहभागी होतील.यात्रोत्सवाचा हा भक्तिभाव आणि सांस्कृतिक समृद्धीचा संगम अनुभवण्यासाठी अमळनेरकर आणि खान्देशातील भाविक सहभागी होतात हा सोहळा उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात साजरा करण्याचे आवाहन संतश्री प्रसाद महाराज यांनी केले आहे.

# कृषी सेवा केंद्रांचा बेमुदत संप; शेतकऱ्यांची चिंता वाढली

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महाराष्ट्र फर्टीलायझर्स, पेस्टिसाईड्स आणि सीड्स डीलर्स असोसिएशन (माफदा)च्या नेतृत्वाखाली केंद्र व राज्य शासनाच्या नव्या धोरणांचा तसेच प्रलंबित मागण्यांच्या निषेधार्थ जळगाव जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यासह राज्यभरातील कृषी सेवा केंद्रे २७ एप्रिलपासून बेमुदत संपावर गेली आहेत. या पूर्वतयारीच्या काळात कृषी निविष्ठांची अधिकृत दुकाने बंद राहिल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

शासनाने नवीन आदेशाद्वारे (जीआर) २३ स्तरांवरील अधिकाऱ्यांना 'गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक' म्हणून नियुक्त केले आहे, याला विक्रेत्यांचा तीव्र विरोध आहे. तसेच एका बॅचमधील एखादे पाकीट निकृष्ट आढळल्यास संपूर्ण परवाना रद्द करण्याच्या कारवाईमुळे विक्रेत्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याशिवाय अनुदानित खतांसोबत बिगर–अनुदानित खते विकण्याच्या खत कंपन्यांच्या दबावाचा (लिंकिंग) विक्रेत्यांनी निषेध केला आहे. एप्रिल महिन्याच्या अखेरीस शेतकरी खरीप हंगामासाठी बियाणे व खतांची साठवणूक करतात. मात्र, या संपामुळे हे नियोजन पूर्णपणे कोलमडले आहे. सध्या उन्हाळी भुईमूग व भाजीपाला पिके बहरात असून कीटकनाशके न मिळाल्यास उत्पादनात मोठी घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यातच अधिकृत दुकाने बंद असल्याने खते व औषधांचा काळाबाजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.शासनाने मागण्या मान्य न केल्यास पॉस मशीन जमा करण्याचा इशारा माफदाने दिला आहे. तर सरकारने यावर त्वरित तोडगा न काढल्यास पेरण्या खोळंबतील, अशी उद्विग्न प्रतिक्रिया शेतकरी वर्गातून येत आहे.खते, बियाणे व कीटकनाशके विक्री करणाऱ्या दुकानदारांनी एकमुखाने या आंदोलनात सहभाग नोंदवला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे हा कठोर निर्णय घेण्यात आला असून, हा लढा केवळ विक्रेत्यांसाठी नसून शेतकऱ्यांना भविष्यात होणारा त्रास कमी करण्यासाठीच असल्याचे संघटनेचे अध्यक्ष योगेश पवार यांनी स्पष्ट केले आहे.



## संपादकीय

# बदलती जीवनशैली अर्धी लोकसंख्या संसर्गाच्या विळख्यात

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या अहवालानुसार देशातील ५०% लोकसंख्या जीवनशैलीशी संबंधित आजारांनी ग्रस्त आहे, ही निःसंशयपणे राष्ट्रीय चिंतेची बाब आहे. ही बाब देखील चिंताजनक आहे की आहार, जीवनशैली आणि तणावामुळे होणाऱ्या आजारांचे प्रमाण, जे एका दशकापूर्वी ३१% होते, ते आता ५०% पर्यंत पोहोचले आहे. एक दिलासादायक बाब म्हणजे, वैद्यकीय सुविधांचा विस्तार आणि नवीन संशोधनामुळे संसर्गजन्य आजारांचे प्रमाण कमी झाले आहे. तथापि, आपल्या आहार आणि जीवनशैलीतील जलद बदलांमुळे, लोक लठ्ठपणा, मधुमेह, तणाव आणि उच्च रक्तदाब यांसारख्या आजारांना बळी पडत आहेत, ज्यामुळे जीवघेण्या आजारांचा धोका वाढत आहे. आपण हे मान्य केले पाहिजे की स्वातंत्र्यापासून देशातील सामान्य माणसाच्या राहणीमानात काही सकारात्मक बदल झाला आहे.ज्यामुळे जीवनशैलीत बदल घडून आला आहे. तथापि, अपुरे पोषण आणि पुरेसा आहार, शारीरिक निष्क्रियता, स्क्रीनसमोर जास्त वेळ घालवल्यामुळे झोपेचा अभाव इत्यादी अनेक घटक या आजारांना कारणीभूत ठरतात. यामध्ये अनुवांशिक आजारांचीही भूमिका असते.

हे आजार, जे हळूहळू शरीराला कमजोर करतात, कालांतराने प्राणघातक ठरतात. आंतरराष्ट्रीय अभ्यासांमधूनही ही चिंता व्यक्त केली जाते की, भारतातील विविध आजारांमुळे होणारे बहुतेक मृत्यू हे संसर्गजन्य रोगांऐवजी जीवनशैलीशी संबंधित आजारांमुळे होतात. ही आपल्यासाठी एक गंभीर चिंतेची बाब असायला हवी. हे निर्विवाद आहे की वैद्यकीय शास्त्रातील अभूतपूर्व प्रगतीमुळे सर्वसामान्य भारतीयांचे आयुर्मान वाढले आहे, परंतु जीवनशैलीशी संबंधित आजारांमधील वाढ या यशाला सुरुंग लावत आहे. यामुळेच देशात आरोग्य विमा व्यवसायात मोठी वाढ झाली आहे आणि ही वाढ ग्रामीण भागात अधिक ठळकपणे दिसून येते. तथापि, या विमा कंपन्या आजार टाळण्यास मदत करण्याऐवजी वैयक्तिक आजारांवर उपचार करण्याला प्राधान्य देतात. मात्र, देशात जीवनशैलीशी संबंधित आजारांविषयीची जागरूकता निश्चितपणे वाढली आहे, ज्याचे श्रेय एनडीए सरकारला जाते. पंतप्रधानांच्या प्रयत्नांमुळे योगाला जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन मिळाले आहे. ही जागरूकता भारतातही आहे, परंतु एक मोठा वर्ग अजूनही यापासून वंचित आहे.

पंतप्रधान 'मन की बात' या रेडिओ कार्यक्रमाद्वारे आणि इतर माध्यमांतून लठ्ठपणा टाळण्याचे आणि आहारात भरड धान्याचा समावेश करण्याचे महत्त्व वारंवार अधोरेखित करतात. परंतु याला अपेक्षित सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. यामुळेच लोकांना महागड्या उपचारांचा आधार घेण्यास भाग पडते. विरोधाभास म्हणजे, डॉक्टर उच्च रक्तदाब आणि मधुमेहासारख्या आजारांसाठी आयुष्यभराची औषधे लिहून देतात. खाजगी रुग्णालयांमधील हृदयविकार आणि इतर आजारांवरील महागड्या उपचारांमुळे अनेक लोक गरिबीच्या चक्रात अडकले आहेत. आपण कोविड-१९ च्या संकटातून मिळालेला धडा लक्षात ठेवला पाहिजे, जेव्हा लोकांनी उपचार घेण्यासाठी आपले दागिने, जमीन आणि घरेसुद्धा गहाण ठेवली होती. तथापि, जर लोकांनी आपली शारीरिक हालचाल वाढवली आणि योग, ध्यान व व्यायामाचा आपल्या जीवनात समावेश केला, तर हे आजार टाळता येऊ शकतात. विरोधाभास म्हणजे, आपण पारंपरिक भारतीय खाद्यपदार्थांकडे दुर्लक्ष केले आहे आणि पाश्चात्य व चायनीज खाद्यपदार्थांचे पर्याय निवडायला सुरुवात केली आहे, जे आपल्या हवामानाला आणि शारीरिक प्रकृतीला अनुकूल नाहीत. जंक फूडमध्ये हानिकारक रसायने असतात, तर तळलेल्या पदार्थांमुळे लठ्ठपणा वाढला आहे. परिणामी, आपण शारीरिक श्रम टाळतो आणि बैठी जीवनशैली जगतो. परिणामी, वाढलेला लठ्ठपणा अनेक आजारांचा वाहक बनतो. रात्री उशिरापर्यंत मोबाईल फोन आणि सोशल मीडियावर सक्रिय राहिल्याने आपल्या झोपेत व्यत्यय आला आहे. झोपेच्या कमतरतेमुळे तणाव आणि नैराश्य वाढले आहे. रात्री उशिरा जेवण्याची, रात्री उशिरा झोपण्याची आणि सकाळी उशिरा उठण्याची आपली सवयदेखील आजारपणास कारणीभूत ठरली आहे. जेव्हापासून आपण पारंपरिक पोषणापेक्षा चवीला प्राधान्य दिले आहे, तेव्हापासून शरीरातील आवश्यक जीवनसत्त्वांची कमतरता वाढत चालली आहे. या संकटात प्रदूषित अन्नाचीही भूमिका आहे. तथापि, साधे वर्तन हे आपल्या आरोग्याची हमी आहे.

# गौरवशाली इतिहास आणि अस्मितेचा उत्सव : महाराष्ट्र दिन

१ मे १९६० हा दिवस महाराष्ट्राच्या इतिहासातील सुवर्णक्षण आहे. या दिवशी केवळ एका राज्याची निर्मिती झाली नाही, तर कोटी कोटी मराठी बांधवांच्या प्रदीर्घ संघर्षाला आणि स्वप्नाला मूर्त रूप मिळाले. दरवर्षी १ मे हा दिवस आपण महाराष्ट्र दिन म्हणून मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरा करतो.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषावार प्रांतरचनेची मागणी जोर धरू लागली होती. मात्र, तत्कालीन केंद्र सरकार द्वैभाषिक मुंबई राज्याच्या बाजूने होते, ज्यात गुजरात आणि महाराष्ट्र एकत्र होते. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, या मागणीसाठी संयुक्त महाराष्ट्र चळवळ उभी राहिली.या आंदोलनादरम्यान १०६ आंदोलकांना आपले प्राण गमवावे लागले. त्यांच्या बलिदानामुळे आणि एस.एम. जोशी, श्री.प. डांगे, प्रल्हाद केशव अत्रे (आचार्य अत्रे) यांच्यासारख्या नेत्यांच्या नेतृत्वामुळे सरकारने नमते घेतले.अखेर १ मे १९६० रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची घोषणा केली. राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी धुरा सांभाळली.महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आणि अस्मितेचा गाभा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. महाराष्ट्र दिनाच्या दिवशी शिवरायांच्या कार्याचा विशेष गौरव केला जातो. त्यांनी स्थापन केलेले स्वराज्य आणि त्यांचे लोककल्याणकारी विचार आजही महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी मार्गदर्शक आहेत. जय महाराष्ट्र ही गर्जना करताना प्रत्येक महाराष्ट्रीयन मनामध्ये शिवरायांचेच तेज असते.महाराष्ट्र दिन हा राज्याच्या कला, साहित्य आणि संगीताच्या वारशाची उजळणी करण्याचा दिवस आहे.ज्ञानेश्वर-तुकारामांच्या अभंगांपासून ते कुसुमाग्रज, पु.ल. देशपांडे यांच्या साहित्यापर्यंतचा समृद्ध प्रवास या दिवशी आठवला जातो.लावणी, पोवाडा, भारूड आणि गोंधळ यांसारख्या लोककलांच्या माध्यमातून महाराष्ट्राची संस्कृती घराघरांत पोहोचते.सह्याद्रीचे गडकिल्ले आणि अजिंठा-वेरूळची लेणी हा महाराष्ट्राचा जागतिक वारसा असून, या दिवशी त्यांचे जतन करण्याचा संकल्प केला जातो.महाराष्ट्र दिन हा संपूर्ण राज्यात एका उत्सवासारखा साजरा होतोः मुंबईतील शिवाजी पार्क येथे राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत भव्य संचलन होते. राज्यभर जिल्हा मुख्यालयांमध्ये ध्वजारोहण केले जाते.क्रीडा, कला, शिक्षण आणि समाजसेवा या क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा शासनातर्फे गौरव करण्यात येतो.शाळा आणि महाविद्यालयांमध्ये मराठी संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या मिरवणुका काढल्या जातात. गर्जा महाराष्ट्र माझा यांसारख्या गीतांनी वातावरण देशभक्तीने भरून जाते.



आज महाराष्ट्र हे भारतातील आघाडीचे औद्योगिक राज्य आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून, पुणे हे विद्येचे माहेरघर आणि आयटी हब म्हणून ओळखले जाते. कृषी क्षेत्रातही महाराष्ट्राने क्रांती घडवली आहे. महाराष्ट्र दिन साजरा करताना राज्याला ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी बनवण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवले जाते.महाराष्ट्र हा विविधतेने नटलेला आहे. कोकणचा समुद्रकिनारा, विदर्भाचे जंगल, खानदेशचे तापीकाठ आणि मराठवाड्याची संतांची भूमी या सर्वांना 'मराठी' ही भाषा आणि 'महाराष्ट्र' ही ओळख एकत्र जोडते. हा दिवस आपल्याला जात, धर्म विसरून एकजुटीने राज्याच्या विकासासाठी काम करण्याची प्रेरणा देतो.महाराष्ट्र दिन हा केवळ सण नसून तो मराठी माणसाच्या स्वाभिमानाचा हुंकार आहे. आपल्या पूर्वजांनी दिलेल्या बलिदानाची आठवण ठेवून, राज्याची संस्कृती जपण्याचे आणि महाराष्ट्राला विकासाच्या शिखरावर नेण्याचे कर्तव्य आपल्या सर्वांचे आहे.

आपणा सर्वांना
'ग्लोबल महातेज' परिवाराकडून
महाराष्ट्र दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा!
जय हिंद, जय महाराष्ट्र!

# उष्णतेच्या लाटेचा फटका; मुक्या जनावरांची दयनीय अवस्था

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील सध्या उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली असून, तापमान जवळपास ४३ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांप्रमाणेच मुक्या जनावरांनादेखील वाढत्या उन्हाचा त्रास सहन करावा लागत आहे.या कडक उन्हाच्या तडाख्यामुळे मुक्या प्राण्यांची अवस्था बिकट झाली आहे. उष्णतेच्या वाढत्या लाटेमुळे जनावरे, भटके प्राणी तसेच पक्षीही मोठ्या प्रमाणात त्रस्त झाले आहेत.



दुपारच्या वेळेत उष्णतेचा कडाका अधिक जाणवत असल्याने गायी, बैल, शेळ्या, मेंढ्या, कुत्रे तसेच इतर भटके प्राणी सावलीच्या शोधात इकडेतिकडे भटकताना दिसत आहेत. अनेक ठिकाणी पाण्याची टंचाई निर्माण झाल्याने प्राण्यांना पिण्यासाठी पाणी मिळणे कठीण झाले आहे. त्यामुळे तहानेने व्याकुळ झालेले प्राणी विहिरी, तलाव किंवा घरांच्या परिसरात पाण्यासाठी फिरताना दिसत आहेत. ग्रामीण भागात शेतीकामासाठी वापरल्या जाणाऱ्या जनावरांनाही या उष्णतेचा मोठा फटका बसत आहे. कडक उन्हात काम केल्याने त्यांना थकवा, अशक्तपणा व उष्माघाताचा धोका वाढत आहे. त्यामुळे अनेक शेतकरी दुपारच्या वेळेत जनावरांना विश्रांती देत असून, सकाळी व संध्याकाळीच कामे करण्यावर भर देत आहेत. याशिवाय, पक्ष्यांनाही पाण्याच्या अभावामुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. नैसर्गिक पाणवठे आटत असल्याने पक्षी पाण्यासाठी भटकताना दिसत आहेत.

**तापमानात विक्रमी वाढ**

सध्या उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली असून तापमान सुमारे ४३ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. दुपारच्या वेळेत उष्णतेचा कडाका अधिक तीव्र जाणवत असून वातावरण अक्षरशः तापलेले दिसत आहे. परिणामी नागरिकांनाच नव्हे तर मुक्या प्राण्यांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

**सावलीच्या शोधात जनावरांची भटकंती**

उन्हाच्या कडक तडाख्यामुळे गायी, बैल, शेळ्या, मेंढ्या तसेच भटके कुत्रे यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. दुपारच्या वेळेत हे प्राणी सावलीच्या शोधात इकडेतिकडे भटकताना दिसत असून उष्णतेमुळे त्यांना थकवा, अशक्तपणा जाणवत आहे. वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचा धोका वाढला असून प्राण्यांचे हाल स्पष्टपणे दिसून येत आहेत.

**जनावरांच्या संरक्षणासाठी उपाययोजना**

उष्णतेचा वाढता प्रभाव लक्षात घेऊन अनेक शेतकरी जनावरांच्या आरोग्याची काळजी घेताना दिसत आहेत. दुपारच्या वेळेत जनावरांना विश्रांती देत असून सकाळी व संध्याकाळीच शेतीकामे करण्यावर भर दिला जात आहे. तसेच जनावरांना पाणी व सावली उपलब्ध करून देण्यासाठी शक्य ते प्रयत्न करण्यात येत असून उष्णतेच्या या लाटेत त्यांचे संरक्षण करण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत.

# उष्माघात! उन्हामुळे मृत्यू का होतो?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपण सगळेच उन्हात फिरतो. पण काही जणांचाच उन्हात गेल्यामुळे अचानक मृत्यू का होतो? आपल्या शरीराचे तापमान नेहमी ३७ अंश सेल्सिअस असते, या तापमानातच शरीरातील सर्व अवयव नीट काम करू शकतात. घामाच्या रूपाने पाणी बाहेर काढून शरीर ३७ अंश सेल्सिअस तापमान कायम राखते, सतत घाम निघत असताना पाणी पीत राहाणे अत्यंत गरजेचे आणि अत्यावश्यक आहे.

पाणी शरीरात इतरही अधिक महत्त्वाची कामे करते. त्यामुळे शरीरातील पाण्याचा साठा कमी झाला, तर शरीर घामाच्या रूपाने पाणी बाहेर टाकणे टाळते. जेव्हा बाहेरचे तापमान ४५ अंशांच्या पुढे जाते आणि शरीरातील कुलिंग व्यवस्था पाण्याच्या अभावाने ठप्प होते तेव्हा शरीराचे तापमान ३७ अंशांच्या पुढे जाऊ लागते. शरीराचे तापमान जेव्हा ४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचते तेव्हा रक्त तापू लागते आणि रक्तातील प्रोटिन अक्षरशः शिजू लागते. (उकळत्या पाण्यात अंडी उकडते तसे) स्नायू कडक होऊ लागतात. त्यात श्वास घेण्यासाठी लागणारे स्नायूही निकामी होतात.

रक्तातील पाणी कमी झाल्यामुळे रक्त घट्ट होते. ब्लडप्रेशर अत्यंत कमी होते, महत्त्वाच्या अवयवांना (विशेषतः मेंदूला) रक्त पुरवठा थांबतो. माणूस कोमात जातो आणि त्याचे एक-एक अवयव अवघ्या काही क्षणांत बंद पडतात आणि त्याचा मृत्यू ओढवतो. उन्हाळ्यात असे अनर्थ टाळण्यासाठी सतत थोडे-थोडे पाणी पीत राहावे व आपल्या शरीराचे तापमान ३७ अंशच कसे राहील, याकडे लक्ष द्यावे.



**उष्माघात टाळा**

उन्हाचा पारा चढत आहे. त्यामुळे उष्माघात टाळण्यासाठी खालील उपाययोजना करा.

- शेतातील कामे सकाळी ६ ते ११ व दुपारी ४ ते सायंकाळी ६.३० या कालावधीत करा.
- काम करताना मध्ये-मध्ये थोडावेळ थांबून पाणी प्या.
- शक्यतो सुती (कॉटन) व पांढऱ्या रंगाचे कपडे वापरा.
- डोक्यावर रुमाल, टोपी इत्यादींचा वापर करा.
- आहारात ताक, दही इत्यादींचा वापर करा. तिखट, तेलकट, मसालेदार पदार्थ, मद्यपान व मांसाहार टाळा.
- कोल्ड्रींक ऐवजी लिंबू सरबत, नारळपाणी यांचा वापर करा.
- दुपारी ११ ते ४ पर्यंत काम, प्रवास टाळा.
- लहान मुलांना, गर्भवतींना, आजारी व्यक्तींना दुपारी घराबाहेर पडू देऊ नका.
- अशक्तपणा, थकवा, ताप-उलट्या इत्यादी लक्षणे आढळल्यास तत्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# दूध उन्हाळ्यात लगेच फाटते?

**जाणून घ्या २४ तास टिकविण्याचे जबरदस्त उपाय!**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



**उन्हाळ्यात दूध पटकन का फाटते?**

उच्च तापमानामुळे दूध लवकर खराब होते आणि फाटण्याची शक्यता वाढते.

**दूध उकळणे खूप गरजेचे**

फक्त एकदा नाही, दिवसातून तीन-चार वेळा दूध उकळल्यास ते जास्त वेळ टिकते.

**हळू आचेवर उकळा**

– दूध उकळताना गॅस मंद ठेवा आणि दोन-तीन वेळा उकळी येऊ द्या.

**– पूर्ण झाकण टाळा गरम**

दूध पूर्ण झाकल्यास ते लवकर खराब होते, जाळीने झाकणे योग्य.

**पाण्यात ठेवा दूध**

दूध उकळून थंड झाल्यावर ते पाण्याने भरलेल्या भांड्यात ठेवा.

**हवेशीर ठिकाणी ठेवा**

– पंख्याखाली किंवा हवेशीर जागेत ठेवल्यास दूध जास्त वेळ टिकते.

**– दर पाच-सहा तासांनी पुन्हा** उकळा दूध वारंवार उकळल्याने ते २४ तासांपर्यंत खराब होत नाही.

**बेकिंग सोड्याची ट्रिक**

उकळताना एक चिमूट बेकिंग सोडा टाकल्यास दूध फाटत नाही (जास्त टाकू नका).

**दूध पॅकेटची कशी काळजी घ्यावी?**

जूट बॅग ओलसर ठेवून किंवा थंड पाण्यात पॅकेट ठेवल्यास दूध ५-६ तास सुरक्षित राहते.

# दहिवद येथे शिक्षकाचा विहिरीत मृतदेह आढळल्याने खळबळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील दहिवद येथील अविनाश पाटील (वय ४५) यांचा मृतदेह गावातील एका विहिरीत आढळून आल्याची घटना २९ रोजी सकाळी ९ वाजता उघडकीस आली.



अविनाश पाटील हे दहिवद येथील माध्यमिक शाळेत शिक्षक होते. मागील २ दिवसापासून ते घरी नसल्याचे समजते. २९ रोजी त्यांचा मृतदेह विहिरीत आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. मृतदेह जास्त वेळ पाण्यात राहिल्याने मृतदेहाची अवस्था बिकट झालेली होती. त्यांच्या मृत्यूचे कारण समजू शकले नाही. माजी जिल्हा परिषद सदस्या मीनाताई रमेश पाटील यांचे ते सुपुत्र होते.

# खानदेशातील सुपुत्राचा सुरत 'मनपा'त दुसऱ्यांदा विजय

## प्रतिस्पर्धी उमेदवारावर डॉ. नरेंद्र पाटील यांनी मिळविले २० हजारांचे मताधिक्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील मालपूर येथील मूळ रहिवासी व सध्या उधना (निलगिरी) येथे वास्तव्यास असलेले डॉ. नरेंद्र शांताराम पाटील यांनी नुकत्याच झालेल्या सुरत महापालिका निवडणुकीत दणदणीत विजय मिळविला आहे. त्यांनी आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवाराचा २० हजारांहून अधिक मतांनी पराभव केला. डॉ. पाटील यांनी भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून हा सलग दुसऱ्यांदा विजय मिळविला आहे.

गेल्या निवडणुकीतही डॉ. पाटील यांनी मोठा जनसंपर्क, अविरत जनसेवेचे कार्य तसेच केंद्रीय जलसंसाधन मंत्री ना. सी. आर. पाटील व आमदार सौ. संगीताताई पाटील यांचे बहुमोल सहकार्य लाभल्याने विजय मिळविला होता. त्याची विशेषत्वाने दखल घेऊन पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर उपमहापौर पदाची जबाबदारी सोपविली होती. ती त्यांनी अतिशय समर्थपणे आपल्या कार्यातून यशस्वीपणे निभावली.

शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या डॉ. पाटील यांनी आपला मनमिळावू स्वभाव, सर्वांशी आपुलकीची वागणूक आणि सातत्यपूर्ण जनसंपर्काच्या बळावर गेल्या दोन दशकांत उल्लेखनीय लोकप्रियता मिळविली आहे. त्यांच्या सामाजिक आणि राजकीय वाटचालीत त्यांच्यासमवेत कार्यरत त्यांच्या धर्मपत्नी सौ. वैशालीताई पाटील यांचाही मोठा वाटा आहे.

या विजयामुळे त्यांच्यावर सुरतसह खानदेशातील विविध सामाजिक, राजकीय स्तरातील लोकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



"भारतीय जनता पक्षाने सलग दुसऱ्यांदा उमेदवारी देऊन माझ्यावर जो विश्वास दाखविला त्याबद्दल पक्षश्रेष्ठींचे मनापासून आभार. मानतो. त्याचप्रमाणे वडील दिवंगत शांताराम तात्या आणि आई बायजाबाई यांचे पाठीशी असलेले आशीर्वाद आणि मार्गदर्शक केंद्रीय मंत्री ना. सी. आर. पाटील साहेब व आमदार सौ. संगीताबेन पाटील यांचे बहुमोल सहकार्य आणि खानदेशातील मुकटी, मेलाणे, लोंढवे आणि परिसरातील विस्तृत नातेवाईक व समर्थक यांनी या परिसरात विणलेल्या जाळ्यामुळे हा विजय मिळणे सोपे झाले. तरीही प्रभागातील मतदारांना, या भागातील जनतेला मी माझा विजय समर्पित करतो. 'जनसेवा हीच ईशसेवा' याप्रमाणे यापुढेही माझे कार्य सुरू राहील.

**– डॉ. नरेंद्र पाटील**

माजी उपमहापौर तथा नगरसेवक, सुरत महापालिका.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# अभिनेत्री आणि निर्माती : अनुष्का शर्मा

**जन्मदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अनुष्का शर्मा ही आधुनिक भारतीय चित्रपटसृष्टीतील एक आघाडीची अभिनेत्री, यशस्वी निर्माती आणि फॅशन आयकॉन आहे. आपल्या पहिल्याच चित्रपटापासून प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या अनुष्काचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे.अनुष्का शर्माचा जन्म १ मे १९८८ रोजी उत्तर प्रदेशातील अयोध्या येथे झाला. तिचे वडील कर्नल अजय कुमार शर्मा हे भारतीय सैन्यात अधिकारी होते, तर आई आशिमा शर्मा गृहिणी आहेत. लष्करी वातावरणात वाढल्यामुळे तिच्या व्यक्तिमत्त्वात शिस्त आणि स्पष्टवक्तेपणा दिसून येतो. तिचे बालपण प्रामुख्याने बंगळुरूमध्ये गेले.अनुष्काने तिचे शालेय शिक्षण बंगळुरूच्या आर्मी स्कूलमधून पूर्ण केले आणि माउंट कार्मेल कॉलेजमधून पदवी मिळवली. तिला सुरुवातीला मॉडेलिंग आणि पत्रकारितेत रस होता.२००७ मध्ये लॅक्मे फॅशन वीक प्रसिद्ध डिझायनर वेंडेल रॉड्रिक्स यांनी तिला संधी दिली आणि तिथून तिच्या मॉडेलिंग कारकीर्दीला सुरुवात झाली.त्यानंतर ती मुंबईत आली आणि जाहिरातींच्या विश्वात आपले स्थान निर्माण करू लागली.अनुष्का शर्माला बॉलिवूडमध्ये सर्वात मोठे आणि स्वप्नवत पदार्पण मिळाले. यशराज फिल्म्सच्या रब ने बना दी जोडी या चित्रपटात तिने शाहरुख खानसोबत काम केले. तानी या भूमिकेतील तिचा सहज सुंदर अभिनय सर्वांना भावला आणि ती रातोरात स्टार बनली.अनुष्काने आपल्या कारकीर्दीत वैविध्यपूर्ण भूमिका निवडण्यावर भर दिला. बँड बाजा बारात श्रुती कक्कड या दिल्लीतील महत्त्वाकांक्षी मुलीची भूमिका करून तिने आपण केवळ एक ग्लॅमरस चेहरा नसून एक कसदार अभिनेत्री आहोत हे सिद्ध केले.जब तक है जान या चित्रपटासाठी तिला फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री पुरस्कार मिळाला. आमीर खानसोबतच्या पीके या चित्रपटात तिने एका पत्रकाराची भूमिका साकारली, जो चित्रपट भारतीय सिनेसृष्टीतील सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांपैकी एक ठरला.सलमान खानसोबत सुलतान चित्रपटात आरफा या महिला कुस्तीपटूची भूमिका साकारून तिने शारीरिक मेहनतीचे आणि आव्हानात्मक काम केले.केवळ अभिनयावर न थांबता अनुष्काने तिचा भाऊ कर्णेश शर्मासोबत क्लीन स्लेट फिल्म्स नावाचे प्रोडक्शन हाऊस सुरू केले. याद्वारे तिने एनएच १०, फिल्लौरी, परी यांसारखे वेगळ्या धाटणीचे चित्रपट आणि पाताल लोक व बुलबुल यांसारख्या प्रसिद्ध वेब सिरीजची निर्मिती केली.डिसेंबर २०१७ मध्ये अनुष्का शर्माने भारतीय क्रिकेट संघाचा दिग्गज खेळाडू विराट कोहली याच्याशी इटलीमध्ये एका खाजगी सोहळ्यात विवाह केला. विरुष्का या नावाने ही जोडी जगभरात लोकप्रिय आहे. त्यांना वामिका आणि अकाय अशी दोन अपत्ये आहेत.अनुष्का प्राण्यांच्या हक्कांसाठी नेहमीच आवाज उठवत असते.
ती शाकाहारी जीवनशैलीचा पुरस्कार करते.तिचा नुश नावाचा स्वतःचा कपड्यांचा ब्रँड देखील आहे.अनुष्का लवकरच महिला क्रिकेटपटू झुलन गोस्वामी यांच्या जीवनावर आधारित चकदा एक्सप्रेस या चित्रपटात दिसणार आहे. या भूमिकेसाठी तिने क्रिकेटचे विशेष प्रशिक्षण घेतले आहे.उद्या १ मे रोजी अनुष्का शर्माचा वाढदिवस आहे. यानिमित्ताने तिच्या यशस्वी वाटचालीस शुभेच्छा!



# दूरदृष्टी असलेले उद्योजक व समाजसेवक : कमलनयन बजाज

**स्मृतिदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कमलनयन बजाज (२३ जानेवारी १९१५ १ मे १९७२) हे भारताचे प्रसिद्ध स्वातंत्र्यसैनिक आणि बजाज समूहाचे संस्थापक जमनालाल बजाज यांचे ज्येष्ठ पुत्र होते. त्यांनी केवळ बजाज समूहाचा विस्तारच केला नाही, तर वडिलांचा सामाजिक आणि नैतिक वारसाही तितक्याच समर्थपणे पुढे नेला. कमलनयन बजाज यांचा जन्म २३ जानेवारी १९१५ रोजी झाला. त्यांचे बालपण महात्मा गांधींच्या विचारांच्या सावलीत गेले. गांधीजी आणि जमनालाल बजाज यांच्यातील घनिष्ट संबंधांमुळे कमलनयनजींना लहानपणापासूनच साधेपणा, राष्ट्रप्रेम आणि नैतिक मूल्ये यांचे बाळकडू मिळाले.त्यांचे शिक्षण साबरमती आश्रम आणि त्यानंतर श्रीलंकेत झाले. उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडला गेले, जिथे त्यांनी केंब्रिज विद्यापीठातून शिक्षण पूर्ण केले. जमनालाल बजाज यांना गांधीजींनी आपला 'पाचवा मुलगा' मानले होते, त्यामुळे कमलनयनजींचे गांधीजींशी रक्ताच्या नात्यासारखेच संबंध होते. त्यांनी गांधीजींच्या मार्गदर्शनाखाली अनेक सामाजिक कार्यात सहभाग घेतला. १९४२ मध्ये वडिलांच्या निधनानंतर, वयाच्या अवघ्या २७ व्या वर्षी कमलनयन बजाज यांच्यावर कुटुंबाची आणि व्यवसायाची मोठी जबाबदारी आली. त्यांनी बजाज समूहाचे रूपांतर एका विशाल औद्योगिक साम्राज्यात केले. त्यांनी ऑटोमोबाईल्स, साखर, सिमेंट आणि इलेक्ट्रिकल अशा विविध क्षेत्रांत बजाज समूहाचा विस्तार केला.

स्वदेशीचा पुरस्कार त्यांनी उद्योगात नेहमीच स्वदेशी तंत्रज्ञान आणि भारतीय कौशल्याला प्राधान्य दिले. स्वातंत्र्यानंतर कमलनयन बजाज राजकारणातही सक्रिय होते.ते वर्धा लोकसभा मतदारसंघातून सलग तीन वेळा (१९५७, १९६२ आणि १९६७) संसदेवर निवडून गेले होते.संसदेत ते आपल्या अभ्यासू आणि स्पष्टवक्त्या स्वभावासाठी ओळखले जात. विशेषतः आर्थिक धोरणांवर त्यांची पकड मजबूत होती.व्यवसाय आणि राजकारण सांभाळून त्यांनी वडिलांनी सुरू केलेल्या सामाजिक संस्थांचे जाळे विस्तारले. गांधीजींचे विचार जगासमोर नेण्यासाठी त्यांनी गांधी स्मारक निधी आणि इतर संस्थांच्या माध्यमातून मोठे काम केले.बजाज फाऊंडेशन समाजसेवेसाठी त्यांनी बजाज समूहाच्या माध्यमातून अनेक लोकोपयोगी उपक्रम राबवले.त्यांचा विवाह सावित्री बजाज यांच्याशी झाला होता. त्यांना राहुल बजाज, शिशिर बजाज ही दोन मुले आणि सुमन जैन ही मुलगी अशी अपत्ये आहेत. त्यांचे चिरंजीव राहुल बजाज यांनी पुढे बजाज समूहाला जागतिक उंचीवर नेऊन ठेवले. कमलनयन बजाज यांचे निधन १ मे १९७२ रोजी झाले. योगायोगाने, उद्या त्यांच्या स्मृतीला उजाळा देण्याचा दिवस आहे. त्यांच्या निधनाने भारताने एक निष्ठावान गांधीवादी उद्योजक आणि लोकसेवक गमावला.

कमलनयन बजाज यांनी व्यवसायात कधीही तत्त्वांशी तडजोड केली नाही. नफा मिळवणे हे उद्योगाचे एकमेव उद्दिष्ट असू शकत नाही, तर समाजाची सेवा करणे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे हा विचार त्यांनी आयुष्यभर जपला.



# वास्तववादी अभिनयाचा मानबिंदू : बलराज साहनी

**जन्मदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बलराज साहनी (१ मे १९१३ १३ एप्रिल १९७३) हे भारतीय चित्रपटसृष्टीतील अशा अभिनेत्यांपैकी एक होते, ज्यांनी आपल्या अभिनयाने 'नायक' या शब्दाची व्याख्याच बदलून टाकली. ग्लॅमरपेक्षा नैसर्गिक अभिनयाला महत्त्व देणारा महान कलाकार.बलराज साहनी यांचा जन्म १ मे १९१३ रोजी पंजाबमधील रावळपिंडी (आताचे पाकिस्तान) येथे झाला. त्यांचे मूळ नाव युधिष्ठिर साहनी होते. त्यांचे धाकटे भाऊ भीष्म साहनी हे हिंदी साहित्यातील एक दिग्गज लेखक (प्रसिद्ध कादंबरी तमसचे लेखक) होते. बलराजजींचे कुटुंब सुशिक्षित आणि सुसंस्कृत होते.त्यांनी लाहोरमधून इंग्रजी साहित्यात एम.ए. केले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते काही काळ आपल्या कौटुंबिक व्यवसायात स्थिरावले होते. मात्र, त्यांच्यातील कलाकाराला शांत बसता येत नव्हते.शांतिनिकेतनः १९३० च्या दशकाच्या उत्तरार्धात ते रवींद्रनाथ टागोर यांच्या 'शांतिनिकेतन'मध्ये शिक्षक म्हणून रुजू झाले. तिथे त्यांच्यावर मानवतावादी विचारांचा मोठा प्रभाव पडला.त्यानंतर त्यांनी वर्धा येथील सेवाग्राम आश्रमात महात्मा गांधींसोबतही काम केले.१९४० मध्ये ते लंडनला गेले आणि तिथे त्यांनी बीबीसीच्या हिंदी सेवेमध्ये रेडिओ अनाऊन्सर म्हणून पाच वर्षे काम केले.भारतात परतल्यानंतर ते मुंबईत आले आणि इप्टा या डाव्या विचारसरणीच्या नाट्यसंस्थेशी जोडले गेले. इथूनच त्यांच्या अभिनयाचा खरा प्रवास सुरू झाला. १९४६ मध्ये इन्साफ या चित्रपटाद्वारे त्यांनी बॉलिवूडमध्ये पदार्पण केले.बलराज साहनी यांनी आपल्या कारकीर्दीत अनेक अजरामर भूमिका साकारल्याः
बिमल रॉय यांच्या दो बिघा जमीन या चित्रपटाने भारतीय चित्रपटसृष्टीला नव्या लाटेची ओळख करून दिली. यात त्यांनी साकारलेला गरीब शेतकरी शंभू महतो आजही प्रेक्षकांच्या डोळ्यांत पाणी आणतो. टागोरांच्या कथेवर आधारित काबुलीवाला या चित्रपटातील त्यांची भूमिका अत्यंत हळवी आणि प्रभावी होती.वक्त चित्रपटातील ऐ मेरी जोहरा जबीं या गाण्यातील त्यांचा रोमँटिक आणि तितकाच संयत अभिनय लोकप्रिय झाला.भारत-पाक फाळणीवर आधारित गरम हवा हा त्यांचा शेवटचा चित्रपट. यात त्यांनी साकारलेला सलीम मिर्झा आजही वास्तववादी अभिनयाचा उत्कृष्ट नमुना मानला जातो.बलराज साहनी हे केवळ नट नव्हते, तर ते एक उच्च दर्जाचे साहित्यिकही होते. त्यांनी पंजाबी आणि इंग्रजी भाषेत लेखन केले.मेरी फिल्मी आत्मकथा हे त्यांचे आत्मचरित्र अत्यंत लोकप्रिय आहे.



# रोज सकाळी कोथिंबीर खाल्ल्याने होतील हे फायदे..

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कोथिंबीर केवळ जेवणाची चव वाढवण्यासाठी नाही, तर औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे.

**फायदे**

रोज सकाळी रिकाम्या पोटी कोथिंबीर घेतल्यास शरीराला कमालीचे फायदे मिळतात.

**पचनक्रिया**

सकाळी कोथिंबीर खाल्ल्याने गॅस, अपचन आणि पोट फुगण्याच्या समस्या दूर होतात.

**किडनी डिटॉक्स**

कोथिंबीर नैसर्गिक 'डाययुरेटिक' आहे. ती शरीरातील विषारी घटक लघवीवाटे बाहेर काढून किडनी स्वच्छ करण्यास मदत करते.

**थायरॉईड**

ज्यांना थायरॉईडची समस्या आहे, त्यांच्यासाठी सकाळी कोथिंबीर किंवा धन्याचे पाणी पिणे अत्यंत फायदेशीर मानले जाते.

**रक्तातील साखर**

कोथिंबीर रक्तातील इन्सुलिनची पातळी संतुलित ठेवण्यास मदत करते, जे मधुमेहींसाठी चांगले आहे.

**डोळ्यांचे आरोग्य**

यात 'व्हिटॅमिन ए' मोठ्या प्रमाणात असते, जे डोळ्यांची दृष्टी सुधारण्यास आणि डोळ्यांच्या जळजळीपासून आराम देण्यास मदत करते.



# घर-घर साबुन बेचने वाला ये लड़का, आज १०० करोड़ का मालिक है।

**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज शमानी को आज कौन नहीं जानता है। यूट्यूब से लेकर इंस्टा और एक्स पर इनकी तगड़ी फैन फॉलोइंग है। २८ वर्ष के राज ने १२ साल तक घिसकर काम किया है और आज उनकी पहचान एक फेमस कंटेंट क्रिएटर, पोडकास्टर, लेखक और स्पीकर के रूप में दर्ज है। राज ने आज जो छवि हासिल की है उनकी पूर्व जिंदगी इनकी चमक धमक से भरी हुई नहीं थी। राज की जिंदगी में १२ साल पहले संघर्ष के अलावा कुछ नहीं था। राज शमानी का जन्म २९ जुलाई, १९९७ को मध्य प्रदेश की आर्थिक राजधानी इंदौर में हुआ था। राज का जन्म एक मिडिल क्लास फैमली में हुआ था। जहां राज शमानी के पिता, नरेश शमानी एक छोटा केमिकल बिजनेस चलाते थे। जब राज १६ साल के थे तो उन्होंने अपने पिता को डायबिटीज से ग्रसित होते देखा। इस हादसे के बाद राज से अपने घर की जिम्मेदारी खुद के कंधों पर संभाली और पिता से १० हजार रूपए लेकर घर में ही लिड डिटरजेंट बनाना शुरू किया। राज ने इस डिटरजेंट का नाम रखा जादूगर ड्रॉप। उन्होंने अपने बिजनेस को सक्सेसफुल बनाने के लिए इस डिटरजेंट को घर-घर जाकर बेचना शुरू किया। उन्होंने प्रतिस्पर्धी ब्रांड की तुलना में अपने प्रोडक्ट को बेहद ही कम दाम में बेचना शुरू कर दिया। पहले जहां इंदौर के दुकानदार राज के इस प्रोडक्ट को लेने से मना कर रहे थे वहीं कुछ ही महीनों में जादूगर ड्रॉप इंदौर का सबसे ज्यादा बिकने वाला लिक्विड डिटरजेंट बन गया। २०१५ में राज ने अपने पिता के केमिकल बिजनेस को अपने जादूगर ड्रॉप में मिला लिया और बिजनेस का एक कंबाइन नाम रखा शामानी इंडस्ट्रीज। शामानी इंडस्ट्रीज इतना सक्सेसफुल रहा कि इस बिजनेस ने २०० करोड़ का टर्नओवर जनरेट किया। इस दौरान राज को एक आईडिया आया कि क्यों न भारतीय युवाओं में भी बिजनेस को लेकर नॉलेज ट्रांसफर किया जाए।राज का मानना था कि अगर बड़ी संख्या तक पहुंचना है तो भाषा पर काम करना बेहद जरूरी है। राज की अंग्रेजी बेहद ही कमजोर थी। उन्होंने हाई-फाई इंग्लिस मीडियम से पढ़ाई नहीं की थी।अपने इस कमजोरी से डरने की बजाय उन्होंने इसे ताकत बनाया और अपनी कमजोरी पर काम किया। राज बाद में कॉर्पोरेट सेमिनारों,टेडेक्स, अनेकों मंच में भाग लेना शुरू किए जहां उन्होंने ना सिर्फ अपने संचार कौशल को बेहतर किया बल्कि अपनी आवाज करोड़ों लोगों तक पहुंचाई। ऊंचाइयों तक पहुंचने से पहले राज कई बार असफल भी हुए हैं..बावजूद इसके वे ४ बार टेडेक्स के स्पीकर रह चुके हैं और युनाइटेड नेशंन की युवा सभा में भारत को रिप्रजेंट किया है। उस दौरान वे वहां के सबसे कम उम्र के स्पीकर थे।सब कुछ सही था और २०२१ में राज ने शुरू किया राज शमनी के साथ बातचीत यूट्यूब चैनल। इस चैनल पर आज १ करोड़ से भी ज्यादा सब्सक्राइबर्स है। इस चैनल पर अबतक ५०० से भी ज्यादा वीडियो रीलिज हो चुके हैं। राज शमनी के साथ बातचीत भारत का नंबर १ बिजनेस पॉडकास्ट के श्रेणी में आता है।ये चैनल राज शमानी के लिए टर्निंग प्वाइंट रहा है जहां से उनकी मीडिया प्रेजेंस स्ट्राँग हुई है। फिंगरिंग आउट विद राज शमानी पर कई बड़ी-बड़ी हस्ती आ चुकी है। इमैनुएल मैक्रॉन, विजय माल्या, मिस्टर बीस्ट, आमिर खान, बिल गेट्स, करण जौहर, खान सर, श्रेया घोषाल, सुनीता विलियम्स, पल्की शर्मा जैसे कई गेस्ट शामिल हो चुके हैं।राज शमानी आज ना सिर्फ एक बिजनेस के मालिक है बल्कि वे कई व्यवसायों से जुड़े हुए हैं। इंटरनेट पर मौजूद जानकारी के मुताबिक।शमानी इंडस्ट्रीज २०० करोड़ रुपये का एफएमसीजी कारोबार पॉडकास्ट प्रायोजन क्रेड, कॉइनडीसीएक्स, ग्रोव जैसे ब्रांडों के साथ साझेदारी यूट्यूब विज्ञापन राजस्व १४.८ मिलियन सब्सक्राइबर से अच्छी कमाई हाउस ऑफ एक्स क्रिएटर्स को ७ दिनों में डी २ सी ब्रांड बनाने में मदद करने वाला प्लेटफॉर्म ,सार्वजनिक भाषण कॉर्पोरेट, इवेंट्स, टेडेक्स , वैश्विक मंच फिगरिंग आउट एकेडमी उद्यमिता और ब्रांडिंग पर ऑनलाइन पाठ्यक्रम एंजेल निवेश एफएमसीजी , फिनटेक, क्रिएटर इकोनॉमी में शुरुआती चरण के स्टार्टअप पुस्तक रॉयल्टी बिल्ड, डोंट टॉक (पेंगुइन रैंडम हाउस, २०२२)राज शमानी कोई पत्रकार नहीं है ना ही उन्होंने पत्रकारिता की पढ़ाई की है बावजूद उनके पॉडकास्ट को करोड़ों लोग देखते हैं। राज अपने पॉडकास्ट में गेस्ट से उन हर सवालों का जिक्र करते हैं जो कहीं न कहीं जनता के प्रश्न होते हैं। राज शमानी आज बहुत बड़ा नाम है जिनके बच्चों से लेकर बड़ों तक हर कोई फैंस है। राज को पॉडकास्टर ऑफ द ईयर, नेशनल क्रिएटर अवार्ड्स २०२४ और राज शमनी के साथ बातचीत के रूप से सम्मानित किया गया है।







शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हाऊस पारोला रोड, धुळे




# शांतता, करुणा आणि प्रज्ञा यांचा त्रिवेणी संगम : बुद्धपौर्णिमा

## बुद्धपौर्णिमा विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बुद्ध पौर्णिमा, ज्याला वैशाख पौर्णिमा किंवा बुद्ध जयंती असेही म्हटले जाते, हा जगभरातील बौद्ध धर्मीयांसाठी आणि शांतताप्रिय मानवांसाठी अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा दिवस आहे. हा दिवस केवळ एका महापुरुषाचा जन्मदिन नसून, तो मानवी कल्याणाचा मार्ग उजळणाऱ्या प्रकाशाचा उत्सव आहे.भगवान गौतम बुद्धांच्या जीवनातील तीन महत्त्वाच्या घटना या दिवशी घडल्या आहेत, म्हणून याला त्रिविध पावन पौर्णिमा असेही म्हणतात.बुद्ध पौर्णिमेचे आगळेवेगळे महत्त्व असे की, भगवान बुद्धांच्या आयुष्यातील तीन प्रमुख घटना वैशाख पौर्णिमेलाच घडल्या होत्या: इ.स.पू. ५६३ मध्ये नेपाळमधील लुंबिनी येथील वनात सिद्धार्थ गौतमाचा जन्म झाला. वयाच्या ३५ व्या वर्षी बिहारमधील गया येथे निरंजना नदीच्या काठी एका पिंपळाच्या वृक्षाखाली (बोधिवृक्ष) त्यांना सत्य आणि ज्ञानाचा साक्षात्कार झाला. तेव्हापासून ते बुद्ध (ज्याला सत्य समजले आहे असा) म्हणून ओळखले जाऊ लागले.वयाच्या ८० व्या वर्षी उत्तर प्रदेशातील कुशीनगर येथे वैशाख पौर्णिमेलाच त्यांनी आपला देह त्यागला.बुद्धांनी जगाला दुःखातून मुक्त होण्यासाठी अत्यंत साधा आणि विवेकनिष्ठ मार्ग सांगितला.



त्यांच्या शिकवणीचा गाभा खालीलप्रमाणे आहे.
चार आर्यसत्यः १. दुःख आहे, २. दुःखाला कारण आहे, ३. दुखाचा निरोध (नाश) होऊ शकतो आणि ४. दुःखाचा नाश करण्याचा मार्ग उपलब्ध आहे.
पंचशीलः अहिंसा, अस्तेय (चोरी न करणे), सत्य, ब्रह्मचर्य आणि अमली पदार्थांपासून दूर राहणे. ही पाच तत्त्वे माणसाला चारित्र्यवान बनवतात.
अष्टांगिक मार्गः सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक कर्मांत, सम्यक उपजीविका, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृती आणि सम्यक समाधी.

हा दिवस अत्यंत शांततेत आणि साधेपणाने साजरा केला जातो.लोक पांढरे वस्त्र परिधान करून बुद्ध विहारांत (मंदिरांत) जातात, बुद्ध वंदना करतात आणि धम्माचे श्रवण करतात. निळा, पिवळा, लाल, पांढरा आणि केशरी अशा पाच रंगांचा धम्मध्वज फडकवला जातो. या दिवशी गरिबांना अन्नदान, वस्त्रदान करणे आणि प्राणीमात्रांवर दया करणे याला विशेष महत्त्व दिले जाते.संध्याकाळी घरासमोर आणि विहारांत मेणबत्त्या किंवा दिवे लावून प्रज्ञा आणि करुणेचा प्रकाश पसरवला जातो.आजच्या धकाधकीच्या आणि संघर्षाच्या काळात बुद्धांचे विचार अधिक प्रासंगिक ठरत आहेत. वैर हे वैराने शमत नाही, तर ते प्रेमाने शमते, हा बुद्धांचा संदेश जागतिक शांततेसाठी पाया मानला जातो. संयुक्त राष्ट्र संघाने देखील बुद्ध पौर्णिमेला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता दिली आहे.महाराष्ट्रात बुद्ध पौर्णिमा मोठ्या प्रमाणावर साजरी केली जाते. चैत्यभूमी (दादर), दीक्षाभूमी (नागपूर) आणि अजंठा-वेरूळच्या लेण्यांमध्ये या दिवशी विशेष उत्साह असतो. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्धांच्या विचारांनी प्रेरित होऊन लाखो अनुयायांसह धम्मचक्र प्रवर्तन केले होते, त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक घराघरात हा दिवस श्रद्धेने साजरा होतो.बुद्ध पौर्णिमा हा केवळ धार्मिक सोहळा नाही, तर तो स्वतःला शोधण्याचा आणि इतरांबद्दल करुणा बाळगण्याचा दिवस आहे. अत्त दीप भव (स्वतःचा प्रकाश स्वतः व्हा) हा बुद्धांचा विचार अंगीकारणे, हीच या दिवसाची खरी सार्थकता ठरेल.

**सर्वांना बुद्ध पौर्णिमेच्या मंगलमयी शुभेच्छा!**



## कामदेव व्रत फलदायी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कामदेव मदनाची सुवर्णमुर्ती करुन वैशाख शु. त्रयोदशीला तिचे पूजन करावे व उपवास करावा. दुसरे दिवशी गरजूस भोजन घालून पूजासामग्रीसहित मूर्तीचे दान करावे व नंतर जेवावे. याप्रमाणे वर्षभर प्रत्येक शु. त्रयोदशीला केले असता सर्व रोग नाहीसे होऊन आरोग्यप्राप्ती होते.

**पूत्रादिप्रद प्रदोषव्रत :** चैत्रादी महिन्यातील प्रदोषव्रताप्रमाणेच या व्रताचा आचार असला, तरी कामनाभेद हा या व्रताचा विशेष आहे.
१) पूत्रप्राप्तीची इच्छा असेल तर ज्या त्रयोदशी दिवशी शनिवार असेल त्या दिवशी सुरूवात करुन वर्षभर अगर फलप्राप्ती होईपर्यंत हे व्रत करावे.
ही पर्वणी मार्च २०२७ मध्ये आहे .
२) ऋणमुक्त होण्याची इच्छा असेल तर ज्या त्रयोदशीला मंगळवार असेल ,तेव्हा सुरूवात करावी.
ही पर्वणी २५ ऑगस्ट, ८ सप्टेंबर २६ रोजी आहे .
३) सौभाग्य अगर स्त्री-समृद्धीची, चांगले पती किंवा पत्नी मिळावी अशी इच्छा असेल तर शुक्रवारी आरंभ होणारी त्रयोदशी घ्यावी.
ही पर्वणी २३ ऑक्टोबर रोजी आहे .
४) अभिष्ट-सिद्धी म्हणजे मनातील कोणतीही इच्छा पूर्ण व्हावी अशी इच्छा असेल तर सोमवारी सुरू होणारी त्रयोदशी असावी.
ही पर्वणी १० ऑगस्ट २६ पासून सुरुवात करावी .
५) आयुरारोग्य , रोगमुक्ती व दीर्घायुष्य याची कामना असेल तर रविवारी येणारी त्रयोदशी असावी.
येत्या १२ जुलै पासून सुरू करावे .

प्रत्येक महिन्याच्या शुद्ध व वद्य त्रयोदशीला हे व्रत करावे. याप्रमाणे एक वर्षभर करावे. व्रतादिवशी प्रातः स्नान करुन मम पुत्रादिप्राप्तिकामनया प्रदोषव्रतमहं करिष्ये असा संकल्प करून व्रतारंभ करावा. सायंकाळी पुन्हा स्नान करावे. श्रीशंकराचे पुढे बसून वेदपाठी व्यक्तीआज्ञेने भवाय भवनाशाय या मंत्राने प्रार्थना करावी व षोड्शोपचारे पूजा करावी. भाजलेले सातूचे पीठ , तूप व साखरेचा नैवेद्य अर्पण करावा. याप्रमाणे करून तेथेच आठ दिशांना आठ दिवे प्रज्वलित करावेत व प्रत्येक दिवा लावताना आठ वेळा नमस्कार करावा. धर्मस्त्वं वृषरूपेण या मंत्राने नंदिकेश्वराला पाणी दुर्वा आदि देऊन त्याची पूजा करावी व त्याला स्पर्श करुन ऋणरोगादि या पूर्ण मंत्राने शंकर, पार्वती आणि नंदिकेश्वराची प्रार्थना करावी. हे व्रत विशेषतः स्त्रियांनी करण्याचे आहे. नंदीच्या शेपूट व शिंगे आदींच्या स्पर्शाने अभीष्टसिद्धी होते.

## रामानुजाचार्य : भाग १

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



आद्य शंकराचार्यांनंतर दक्षिणेत तीनशे वर्षांनी अकराव्या शतकात रामानुजाचार्य जन्मले. त्यांनी त्यांच्या अगोदर सु. दीड हजार वर्षे प्रचलित असलेल्या वैष्णव संप्रदायाला ब्रह्मसूत्रावर भाष्य लिहून वेदान्ताचा आधार दिला आणि भक्तिमार्गाला ज्ञान व कर्म यांच्यापेक्षा अधिक माहात्म्य प्राप्त करून दिले. कर्म व ज्ञान यांनी चित्त शुद्ध होते आणि भक्तियोगानेच मोक्षाधिकार प्राप्त होतो, असा शंकराचार्यांपेक्षा काहीसा वेगळा सिद्धांत त्यांनी स्थापन केला.

दक्षिणेत तमिळनाडूमध्ये रामानुजाचार्यांच्या अगोदरपासून सु. ६०० वर्षे आळवार नावाच्या वैष्णव साधुसंतांचा संप्रदाय सुरू होता. त्यांचे तमिळ भाषेतील उच्च धार्मिक आशयाचे प्रबंध होते. त्या प्रबंधांना वेदांच्या इतकेच प्रामाण्य होते म्हणून त्यांना द्राविड वेद अशी पदवी प्राप्त झाली होती. या आळवारांच्या संतमालिकेत नम्माळवार किंवा शठकोपमुनी यांना सर्वश्रेष्ठ स्थान दिले आहे. त्यांच्या प्रबंधाचा तिरुवायमोळि वा दिव्य प्रबंधम् असा निर्देश होतो. महाराष्ट्रात गेल्या सातशे वर्षांत ज्ञानदेव-नामदेव, एकनाथ-तुकाराम ही जशी संतमालिका प्रसिद्ध आहे तशीच रामानुजाचार्यांच्या अगोदर सु. ६०० वर्षांमध्ये दक्षिणेत अनेक संतकवींची मालिका निर्माण झाली. आचार्यही अनेक झाले. नाथमुनी (नववे-दहावे शतक), यामुनमुनी (सु. ९१८ सु. १०३८) आणि त्यानंतर रामानुजाचार्य आणि वेदान्तदेशिक वा वेंकटनाथ (सु. १२६९ सु. १३७१) झाले. यामुनमुनींचे सिद्धित्रय, आगमप्रामाण्य, गीतार्थसंग्रह, महापुरुषनिर्णय, चतुःश्लोकी व स्तोत्ररत्न हे संस्कृत ग्रंथ प्रसिद्ध आहेत. शांकर वेदान्तामध्ये गौडपादाचार्यांना जे स्थान आहे, तेच स्थान वैष्णव संप्रदायात यामुनमुनींना आहे. रामानुजांना भाष्यकार म्हणून व वैष्णव संप्रदायाचे श्रेष्ठ तत्वज्ञ म्हणून स्थान प्राप्त झाले त्यांच्या पाठीमागे यामुनमुनींची प्रेरणा होती.आळवार संतांच्या परंपरेमध्ये शूद्रातिशूद्रांचाही अंतर्भाव झालेला दिसतो. मुक्ताबाईसारख्या महिला संतही या आळवारांच्या मालिकेत चमकून गेल्या आहेत.

गोदा किंवा आंडाळ हिच्या १७३ कविता तमिळ भाषेमध्ये अप्रतिम म्हणून गणल्या जातात. तिने मनाने देवालाच वरले होते.तिरुप्पाण आळवार हा पंचम जातीत म्हणजे दलितात जन्मलेला चोखामेळ्यासारखा संत होता. हा सतत वीणाधारी आणि भजनात निरंतर दंग असलेला संत होता. तिरुप्पाण आळवाराची एक मोठी सूचक गोष्ट सांगण्यात येते, श्रीरंगम् येथे तिरुप्पाण आळवार कावेरी नदीच्या घाटावर बसून वीणेवर भक्तांच्या कविता गात बसे. एकदा तो श्रीरंगनाथस्वामींच्या मंदिरासमोर द्वारमार्गावर वीणेच्या तारा छेडीत भजनात दंग झाला होता येणाऱ्या जाणाऱ्यांचे भान राहिले नाही तेव्हा मंदिराचा लोकसारंगमुनी हा पुजारी मंदिराकडे जाऊ लागला असताना, मंदिराच्या दरवाज्यात बेभान होऊन गाणाऱ्या तिरुप्पाण आळवाराला बाजूला होण्यास त्याने सांगितले कारण तो अस्पृश्य असावा असे लक्षात आले. तो भजनात दंग असल्याने त्याला हे ऐकू आले नाही. लोकसारंगमुनीने त्याला दगड मारला आणि जोराची शिवीगाळ केली. तो बिचारा काही न बोलता अधिक मार बसू नये म्हणून भिऊन पळाला. हे घडत असताना मंदिराचे दरवाजे आपोआप बंद झाले. ही वेळ देवपूजेची होती. यावेळी दरवाजे सताड उघडे रहावयाचे. लोकसारंगमुनीने दरवाजे जोरात हलवले. आतून कोणी बंद केले असतील म्हणून बाहेरून हाका मारल्या. आतून उत्तर आले नाही आणि दरवाजेही उघडले नाहीत. लोक जमले, सर्वांनी प्रयत्न केला. दरवाजे उघडेनात. आतून आकाशवाणी ऐकू आली, मी रंगनाथस्वामी मला दगड मारला, शिवी दिली. म्हणून मी दरवाजा बंद केला आहे. कावेरीच्या घाटावर एक महापुरुष माझ्या नामस्मरणात तल्लीन झाला आहे. त्याला खांद्यावर घ्या, मंदिराची प्रदक्षिणा करा, तर हे दरवाजे उघडतील, नाहीतर दरवाजे उघडणे शक्य नाही'. लोकसारंगमुनी घाटावर धावत गेला आणि तिरुप्पाण आळवाराला खांद्यावर बसण्याची त्याने विनंती केली. त्याने उत्तर दिले, मी अस्पृश्य, अतिशूद्र आहे. मी त्या द्वारमार्गावर भजन करीत बसलो, हा माझा अपराध आहे. मी तुमच्या देहाला दूषित करू इच्छित नाही. तिरुप्पाण आळवाराचे हे बोलणे न मानता क्षमा मागून लोकसारंगमुनीने तिरुप्पाणला खांद्यावर घेतले, प्रदक्षिणा केली रंगनाथस्वामीचे दरवाजे आपोआप उघडले गेले. तेव्हापासून तिरुप्पाणला मुनिवाहन अशी पदवी प्राप्त झाली.



## श्री धनकवडीचा योगी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हैदराबादचा निजाम पहिला महाराजांना मानित असे. पण निजाम दुसरा त्यांना मानित नसे. एकदा महाराज त्याच्या दरबारात गेले असता. त्याने महाराजांचा अपमान करून आपला दिवाण सालारजंग याचे करवी हाकलून दिले. जाताना महाराजांनी दिवाणास सांगितले की तुझा राजा मला त्याच्या सिंहासनावर बसवेल, बघशील तू, महाराज तिथून निघून गेले. त्यानंतर काही वेळातच ढग दाटून आले. सोसाट्याचा वारा सुटला. मेघगर्जना होऊन पाऊस कोसळू लागला. संततधार पावसाने सारा मुलूख पाण्यात बुडाला. निजाम चिंतेत पडला. दिवाणाने त्यास सांगितले, की खाविंद आपण महाराजांचा अपमान केलात म्हणूनच आपल्या मुलूखावर हे आसमानी संकट कोसळले आहे. आपण महाराजांना शरण जा. त्यांची माफी मागा तेच या संकटातून आपल्याला वाचवतील. निजामाला आपली चूक उमगली. त्याने महाराजांना शोधून सन्मानपूर्वक दरबारात आणले. आपल्या सिंहासनावर बसविले. हात जोडून त्यांची माफी मागितली आणि उपाय विचारला. महाराज म्हणाले जा खणानारळाने नदीची ओटी भरा. निजामाने त्याप्रमाणे केले व संकट टळले. पूर ओसरला आणि राज्य वाचले.

महाराजांनी निजामाला त्याची पूर्वजन्माची ओळख करून देत सांगितले अरे मागच्या जन्मीचा रजक धोबी तू मीच तुला राजा केला...!!!



## पंढरी महात्म्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रीक्षेत्र पंढरपूर म्हणजे महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी. श्री विठ्ठल-रुक्मिणी म्हणजे महाराष्ट्राचे लोकप्रिय दैवत. चंद्रभागा आणि भक्त पुंडलिक ही भक्तांची श्रद्धेची ठिकाणे. आजपर्यंत अध्यात्मनगरी पंढरीचा महिमा वर्णन करणारी अनेक पुस्तके लिहिली गेली. ज्या ग्रंथांच्या आधारे ही पुस्तके लिहिली गेली ती वाङ्मयीन साधने अत्यंत दुर्मिळ आहेत. 'पंढरी महात्म्य' किंवा 'पांडुरंग महात्म्य' या नावाने ती परिचित आहेत. अद्यापही काही अप्रकाशित दुर्मिळ महात्म्य संशोधकांना हस्तलिखितातून उपलब्ध होत आहेत. त्यामधील दुर्मिळ पंढरी महात्म्यांचा परिचय.

**१) गोपाळ बोधाचे 'पंढरी महात्म्य'**

महान संत कवी, गोपाळबोध गोपाळबोध गोसावी, बोधगोपाळ या नावाने ओळखले जाणारे गोपाळनाथ माळगावकर. त्यांचा काळ इ.स. १६५० ते १७४०. त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील मालवणजवळील परुळे या गावाचा. दुष्काळात वडील वारल्यामुळे कुटुंबावर कठीण दिवस आले. गोपाळनाथ आईबरोबर पंढरीच्या वारीस गेले. तेथे त्यांची माणकोजी बोधले यांच्याशी भेट झाली. माणकोजी बोधले यांनी त्यांना आपल्या गावी धामणगावला नेले. त्यांनी नाथपंथीयाप्रमाणे सांप्रदायिक उपदेश केला. पुढे गुरूंच्या आज्ञेवरून विठ्ठलाच्या पादुका आणि पालखी घेऊन ते कोकणात सावंतवाडीला आले. सावंतवाडीच्या राजांनी जवळच्या माळगावी इनाम उत्पन्न करून दिले. तेथे एक विठ्ठल मंदिर बांधले. कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी भागवत सांप्रदायाचा प्रचार व प्रसार केला. वयाच्या ८० व्या वर्षी त्यांनी माळगावीच समाधी घेतली. पण हयात असेपर्यंत त्यांची पंढरपूरची वारी चुकली नाही. त्यांनी 'पांडुरंग महात्म्य'ची रचना केली.

गोपाळ बोधाची 'पंढरी महात्म्याचे' दुर्मिळ हस्तलिखित संत साहित्याचे संशोधक, डेक्कन कॉलेजचे प्राध्यापक डॉ. रा. ग. हर्षे यांच्या संग्रहात होते. ते त्यांनी भांडारकर संशोधन संस्थेकडे सुपूर्द केले. हस्तलिखित सुंदर हस्ताक्षरात तीन बाय पाच इंच कागदावर लिहिले असून पाच अध्यायांच्या ग्रंथांची ओवी संख्या सहाशे इतकी आहे. पंढरी महात्मे याची रचना स्कंद पुराणानुसार असल्याचे म्हटले जाते आहे. पहिल्या अध्यात संतश्रेष्ठ नामदेव अकस्मातपणे पंढरपूरला आले आणि श्री विठ्ठल क्षेत्राचा महिमा परोपकारार्थ विचारला. दुसऱ्या अध्यात शिवपार्वती या क्षेत्रात आले त्यावेळी विठ्ठल देवतांचे महात्म्य काहीच नव्हते. पार्वतीला तहान लागली त्रिशूळाने झरा फोडून शिवाने भागीरथी निर्माण केली. शिवपार्वती तृप्त झाली. ते दोघे जगन्नाथाच्या आश्रमाला निघून गेले. तीर्थस्नानाने पंढरपूरला भाविक मुक्ती पावू लागले. यमाने शिवाकडे कर्तव्यपूर्तीसाठी तक्रार केली. शिवनिर्मित दैत्याचा विष्णूने वध केला. तिसऱ्या अध्यायात लोहदंड तीर्थाचे महत्त्व वर्णन केले आहे. चंद्राच्या शरीरावर क्षते जी शापामुळे निर्माण झाली होती, ती लोह दंडातील स्नानाने नाहीशी झाली. याच अध्यायात पुंडलिक कथा आली आहे. चौथ्या अध्यायात पुंडलिक कुकुटेश्वर ऋषींना भेटणे, आई-वडिलांचा अव्हेर करून तीर्थ यात्रेला गेल्याचा पश्चाताप, आई-वडिलांची सेवा, इंद्राच्या सांगण्यावरून नारदाकडून कृष्णाला पंढरपूर येण्याची साकडे. पाचव्या अध्यायात श्रीमुख संवत्सरात कार्तिक शुद्ध दशमीला पहिल्या प्रहरीत बुधवारी श्रीकृष्ण पंढरपुरात आले. पुंडलिक लक्ष देत नाही हे पाहून भीमाशंकर पर्वतावरून गंगा आणवली. येणारा प्रवाह पुंडलिकाने स्थिर केला. तो चमत्कार पाहून देव भेटायला आले. आसन म्हणून वीट दिली. देव त्यावर समचरण उभा राहिले. देवाने आपली ओळख "विठ्ठल" म्हणून करून दिली. अशी विठ्ठलाची व्युत्पत्ती दिली आहे.

पुंडलिकाने एका संवत्सरातदोन यात्रा भरवाव्यात व भक्तांना पावन करावे अशी मागणी केली. सकाळ तीर्थाचे माहेर जाणे । जगदोद्धारक पंढरपूर असा वर मागून घेतला. तीर्थाची व्याख्या करताना गोपाळनाथ म्हणतात-

**सर्वाभूती समदया । अन्नदान घडे जया ।**
**घरी तीर्थ त्याचीया । विसावया येतील ।**

पंढरपूरविषयी ते लिहितात-

**ही मुक्तीची नगरी । अनुपम-महिवरी ।**
**निर्माण केली साजरी । तारक पंढरी तिही लोकी।**

गोपाळ नाथांनी केलेली रचना अत्यंत प्रासादिक असून दृष्टांताची खैरात करणारी आहे. 'श्री विठ्ठल आणि पंढरपूर'विषयी अभ्यासाचे एक साधन म्हणून हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा आहे.

**२) बाळक व्यासकृत पांडुरंग महात्म्य**

बाळकव्यास हे कन्नड कवी त्यांच्याबद्दलचे अधिक माहिती उपलब्ध होत नाही. 'पांडुरंग महात्म्य' अध्याय एक ते बारा आहेत. एकूण ओव्यांची संख्या ३९६० असून २८५ पृष्ठे आहेत. यात भगवान शंकर नारदास सांगतात, की पंढरपूरचे विठ्ठल गोपरूपी आहेत. श्रीक्षेत्र पंढरपूर हेपूर्वाभिमुख असून विठ्ठल देवता पश्चिमाभिमुख उभी आहे. या ग्रंथाची शेवटची सहा पाने उपलब्ध नाहीत. त्यामुळे ग्रंथ अपूर्ण आहे. माहितीही कमी उपलब्ध आहे.

**३) गुरुदासाचे 'पांडुरंग महात्म'**

कवी गुरुदास हे कन्नड कवी मराठी अभ्यासकांना अपरिचित असलेले संत कवी. त्यांनी पांडुरंग महात्म्याचे हस्तलिखित लिहिले आहे. ते हस्तलिखित भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थेत उपलब्ध आहे. हे हस्तलिखित सुमारे चारशे वर्षांपूर्वीचे आहे. संतकवी गुरुदास यांचे गुरू पूर्णानंद स्वामी होते. फारशी माहिती उपलब्ध होत नाही.

**४) अनंत देवकृत "पांडुरंग महात्म्य"**

ग्रंथकार अनंत देव यांची माहिती उपलब्ध नाही. स्कंद पुराणावर आधारित हा ग्रंथ आहे. बारा अध्यायांची मराठी टीका आहे. मूळ ग्रंथ समर्थ वाग्देवता मंदिर धुळे येथे उपलब्ध आहे.

**५) प्रल्हाद महाराज बडवे यांचे 'पंढरी महात्म्य'**

कराडजवळील तांबेव या गावाचे प्रल्हाद महाराज बडवे. त्यांचे गुरु राघव. बडवे घराण्यात पांडुरंगाला पुराण सांगण्याची नित्यसेवा होती. पण मुस्लिमांच्या आक्रमणामुळे विठ्ठल मूर्ती परगावी सांभाळून ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. एकदा देगावला तर एकदा पुळूजला हलवण्याची नोंद इतिहासात आहे. प्रल्हाद महाराजांनी स्कंद पुराणाच्या आधारित पांडुरंग महात्म्याची रचना केली. त्यांनी लिहिलेल्या पांडुरंग महात्म्याच्या १८९ ओव्या आहेत. विटेवरील बालमूर्तीचे वर्णन त्यांनी पदलालित्यपूर्ण केले आहे. ते लिहितात-

**पंचवर्षारविंद नयन । सरळनासा सुहास्य वदन ।**
**कुंद कुंडमल सुशोभन । सूक्ष्म दर्शन विराजति ।**

प्रल्हाद महाराजांची रचना अनुपप्रासयुक्त आहेत. त्यांचा समाधिकाल शके १६४० आहे.

**६) तेनालीरामाचे पांडुरंग महात्म्य**

दक्षिण भारतातील 'विकटकवी' म्हणून प्रसिद्ध असणारे, हजरजबाबी, विनोदी बुद्धीचे, चातुर्य बुद्धीच्या कथा सुप्रसिद्ध आहेत पण त्यांनी लिहिलेले तेलगू भाषेतील 'पांडुरंग महात्म्य' मात्र मराठी अभ्यासकांना फारसे माहीत नाही.

कृष्णदेवराय हे ललित कलांचे आश्रयदाते होते. त्यांच्या उत्तरार्धात तेनाली रामचंद्र हे विजयनगर दरबारात आले. तेनाली रामचंद्र हे गुंतुर जिल्ह्यातील. तेलगू साहित्यात त्यांनी पाच महाकाव्य निर्माण केली. १५६५ मध्ये त्यांनी 'पांडुरंग महात्म्य'ची रचना केली. पांडुरंग महात्मस्कंद पुराणात मुळात आलेला आहे. त्याच्या आधारावर तेनाली रामचंद्रने आपल काव्य रचले आहे. पाच अध्यायाच्या काव्यात पंढरपूर क्षेत्राचे वर्णन केले आहे. यालाच पौन्डरिक महात्म्य असे नाव आहे. कवी श्रीधर स्वामी नाझरेकर यांच्या आधी शंभर वर्ष तेनाली रामचंद्र यांनी तेलगूत पांडुरंग महात्मे लिहिले होते. पांडुरंगाची ही महात्म्य कथा शिवांकडून नारदाला सुताकडून शौनकाला तेनालीकडून विठ्ठल भक्ताला संक्रमित झाली आहे. पांडुरंग महात्म्यात काय आहे ते आज दृश्य स्वरूपात पंढरपुरात किंवा आसपास दिसते काय याचा शोध घ्यायला हवा. त्यासाठी डेन्मार्कचे संशोधक प्राध्यापक एरिक सॅन्ड हे आठवडाभर येऊन पंढरपुरास वास्तव्यास होते. तेनाली रामाचे पांडुरंग महात्म्य संशोधकांना अधिक सोशोधन करण्यास वाव देणारे आहे.

**७) श्रीधर नाझरेकर यांचे पंढरी महात्म्य**

श्रीधर शास्त्री नाझरेकर यांनी १६९० मध्ये पंढरी महात्म्य नावाचा एकूण ३१ अध्याय असलेला ग्रंथ. त्यात १२६८ ओव्या आहेत. हा ग्रंथ पद्मपुराणतून घेतला आहे. ते म्हणतात-

**पद्मपुराणीचे उत्तम । श्रीपांडुरंगमहात्म्य ते वदवी जेणे परम । सुखसागर उचंबळे**

पांडुरंग पंढरी राहावयास का आले? दिंडीरे वन हे नाव का दिले? ती कथा सांगून पहिला अध्याय समाप्त केला. दुसरा अध्यायात त्यांनी पुंडलिकाची कथा दिली. तिसरा अध्याय भीमा नदी कशी अवतरली हे सांगितले. चौथ्या अध्यायात ज्या विटेवर पांडुरंग उभा आहे, ती वीट पूर्वी कोण होती ही कथा. पाचव्या अध्यायात पंढरपूर क्षेत्राचे महिमा वर्णन केले आहे. सहाव्या अध्यायात चंद्रभागा हे नाव कसे ठेवले हे सांगितले आहे. सातव्या अध्याय भीमा निरा संगम कसा झाला हे सांगितले. आठव्या अध्यायात बिंदूतीर्थाचा महिमा सांगितला आहे. नव्या अध्यायात सुश्रुमा ब्राह्मणाची गोष्ट सांगितली आहे. दहाव्या अध्याय बिंदू तीर्थाची महात्म्य वर्णन आहे. पुढील अध्यायात विविध कथा सांगितले आहेत.पंधराव्या अध्यायत भृगुराजाची गोष्ट सांगून अखेरीस पंढरीचा महिमा वर्णीला आहे.

**बहुत काळाचे आदि क्षेत्र ।**
**ब्रह्मादिदेवांचे माहेर ॥**
**संत भक्तांचे निजघर ।**
**ते पंढरपूर जाण पा ॥**
**पंढरीपुढे भीमानीं ।**
**क्षेत्र वामभागे वाळूवंटी ॥**
**बिंदूस्थानाचे निकटी ।**
**ब्रम्हानंद समाधीस्थ ॥**

पंढरपूर तीर्थक्षेत्राचे महात्म्य वर्णन करताना लिहितात-

**जो पापी परम अघोरी । तो न जाये पंढरपुरी ॥**
**तेणे न देखिली पंढरी । पशु निर्धारि तोचि पै ॥**
**संसारी जो आला प्राणी । तेथे पंढरी पहावी नयनी ॥**
**विटेवरी उभा मोक्षदानी । वाट पाहे भक्तांची ॥**
**पांडुरंग तोचि ब्रह्मानंद । उभयनामी तो अभेद ॥**
**श्रीधरस्वामी प्रसिद्ध । भीमातीरी नांदतसे ॥**

अशाप्रकारे अनेक पंढरपूर महात्म्य ग्रंथ आहेत. काही हस्तलिखिते आहेत, अप्रकाशित लेख, काही अभंगात्मक स्वरूपात उपलब्ध आहेत. संशोधकांसाठी हा एक अमूल्य ठेवा आहे. काही परदेशी संशोधकांनी संशोधनही केले आहे.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**